# Maharashtra Board Class 10 Sanskrit Amod Notes Chapter 1 आधकृषकः पृयुवैयः

## आधकृषकः पृयुवैयः Summary in Marathi

प्रस्तावना :

1. भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशाच्या समग्र सामाजिक व आर्थिक उभारणीमध्ये कृषी (शेती) महत्त्वाची भूमिका बजावते.
2. वेन राजाचा पुत्र, पृथुवैन्य/पृथु राजाने शेतीविषयक कार्याचे संशोधन केले; त्याचा प्रारंभ करून विकास केला.
3. पृथु राजाच्या कार्यस्मरणार्थ वसुंधरेस पृथ्वी असे संबोधले जाते.
4. प्रस्तुत भाग, म्हणजे पृथु राजाने केलेल्या कृषिविषयक कार्याचा प्रारंभ तसेच कृषी संस्कृती याचे विवरण करणारी आख्यायिका आहे.

परिच्छेदः 1.

भूपाल: ........ यतस्त।

अनुवादः

राजा पृथुवैन्य म्हणजे पृथ्वीवरील सर्वप्रथम अभिषिक्त सम्राट
(होय.) प्रयागक्षेत्रात पृथु राजाची राजधानी होती. राज्याभिषेकासमयी, भाट (स्तुतिपाठक) पृथु राजाची स्तुती गाण्यास उत्सुक होते. नंतर, पृथु राजाने आदेश दिला, ”कृपया भाटांनी थांबावे! जोपर्यंत माझ्यातील सद्गुणांचे दर्शन होत नाही, तोपर्यंत माझी स्तुती केली जाऊ नये. ईश्वराचेच स्तवन व्हावे.” पृथु राजाची अशी नि:स्पृह (नि:स्वार्थी) वृत्ती जाणून स्तुतिपाठक संतुष्ट झाले. एकदा पृथु राजा

त्याच्या राज्यात भ्रमण करत होता. त्याने फिरताना पाहिले की, त्याची प्रजा क्षीण (बारीक) व अशक्त झाली आहे. ते प्रजाजन प्राण्याप्रमाणे आयुष्य जगत होते. (ते) हलक्या दर्जाचे/कमी प्रतीचे अन्न खात होते. ते पाहून राजा चिंताग्रस्त झाला. तेव्हा पुरोहित (उपाध्याय) म्हणाले, ”हे राजा, खरेतर धन (समृद्धी), धान्य इत्यादी सर्व वस्तू धरणीच्या पोटातच असतात. (वास करतात.) (कृपया) त्या प्राप्त करण्यासाठी तू प्रयत्न कर.”

परिच्छेदः 2.

तदा पृथुभूपेन ..................... कुरु।

अनुवादः

मराठी त्यानंतर, त्याकरिता पृथुराजाने धनुष्य तयार ठेवले. मग
पृथ्वी स्त्रीचे रूप धारण करून त्याच्यासमोर प्रकट झाली व म्हणाली, ”हे राजा! जुलमी असणाऱ्या तुझ्या वडिलांनी, वेनराजाने राजधर्माचे पालन केले नाही. त्यानंतर, चोर-लुटारूंच्या भयामुळे मी, धन-धान्य-फुले-फळे माझ्या पोटात

ठेवले. तू निश्चितच प्रजेच्या हिताविषयी सतर्क असणारा राजा आहेस, जर तू प्रयत्नपूर्वक कृषिकार्य केलेस, तर मी प्रसन्न होईन. म्हणून धनुष्य सोडून दे. तुझ्या प्रजाजनांसमवेत फावडे, नांगर, कुदळ, विळे (हे सर्व) हातात घेऊन कृषिकार्य कर."

परिच्छेदः 3.

भूमातुः ................ अभवत्।

अनुवादः

मराठी धरणीमातेचा उपदेश लक्षात येऊन, पृथुवैन्य राजाने नद्यांचा मार्ग थांबवून पाण्याचा उपयोग कृषिकामासाठी केला.
(राजाने) पावसाच्या पाण्याचा साठा करून पाण्याचे व्यवस्थापन केले. (त्याने) जमीन अधिक सुपीक होण्यासाठी प्रयत्न केले. नंतर, लोकांनी त्या ठिकाणी (शेतात) धान्यबीजे पेरली.

त्याने अनेक वृक्षांपासून विविध प्रकारच्या बीजांचे परिश्रमपूर्वक संचय व निवड केली. (व) नंतर बीजांचे संस्करण करून पेरणी केली. पावसानंतर बीजांतून अंकुर फुटले. धान्याच्या प्राप्तीमुळे सर्व प्रजा आनंदित झाली. हा कल्याणकारी राजा पृथ्वीवर, प्रशासनात अग्रेसर व जनसेवाव्रती ठरला.

शब्दार्थाः

1. भूपाल: - king – राजा
2. अभिषिक्तः – coronated – अभिषेक झालेला
3. स्तोतव्यः – worthy to be praised – स्तुती करण्यायोग्य
4. चिन्ताकुलः – worried – चिंताग्रस्त
5. पुरोहितः – priest - उपाध्याय
6. चारणा: – bards – भाट (स्तुतिपाठक)
7. कृशाः - lean – बारीक
8. अशक्ता: – weak – अशक्त
9. नि:स्पृहता – detachment - निःस्पृहा, निरिच्छा
10. भ्रमणम् - wandering – फिरणे
11. वस्तुजातम् – things – सर्व वस्तू
12. निकृष्टान्नम् – low-quality food – हलक्या दर्जाचे अन्न
13. एतादृशीम् – such – अशी
14. उदरे – in belly – पोटात
15. धरायाम् – on the earth – पृथ्वीवर
16. प्रकटीभवन्ति – manifested – प्रकट होतात
17. यतस्व – take effort – प्रयत्न कर
18. तिष्ठन्तु – please wait – थांबावे
19. आज्ञापयत् – ordered – आज्ञा केली
20. दृष्ट्वा - having seen – पाहून
21. प्राप्तुम् – to obtain – मिळविण्यासाठी
22. पशुवत् – like animals – प्राण्याप्रमाणे

https://www.evidyarthi.in/

23. यावत्-तावत् – as long as-till then – जोपर्यंत-तोपर्यंत
24. वस्तुतः – in fact – मुळात, खरे पाहता
25. दु:शासकः – bad ruler – जुलमी राजा
26. प्रजाहितदक्षः - prompt towards subject's welfare – प्रजाहितासाठी तयार / सतर्क
27. हल: – a plough – नांगर
28. कुद्दालकम् – hoe – कुदळ
29. धनु: – bow – धनुष्य
30. सज्जीकृतम् – set – तयार केले
31. भूमिः – earth – पृथ्वी
32. प्रकटिता – appeared – प्रकट झाली
33. खनित्राणि – spades – फावडे
34. लवित्राणि - sickles – विळे
35. निहितानि - placed/laid – ठेवलेले
36. तदर्थम् – for that – त्यासाठी
37. धृत्वा - taking/bearing – घेऊन/धारण करून
38. गृहीत्वा – having taken – घेऊन
39. पुरत: - in front of – च्या पुढे
40. चोरलुण्ठक – due to fear from – चोर, लुटारुच्या
41. भयात् – thief and robber – भीतीने
42. त्यज – leave – सोड
43. अग्रणी: - foremost – अग्रेसर
44. जनसेवाव्रती – committed to the service of public – जनसेवेचे व्रत घेतलेला
45. कल्याणकारी – welfare-oriented – कल्याण करणारा
46. सन्तुष्टा: - satisfied – समाधानी
47. धान्यबीजानि – seeds of grains – धान्याच्या बिया
48. सङ्कलनम् - collection – साठा
49. चयनम् – selection – निवड
50. संस्करणम् – having polished/refined – शुद्धीकरण करून
51. जलव्यवस्थापनम् - management of water – पाण्याचे व्यवस्थापन
52. उर्वरतमाम् – most fertile – अधिक सुपीक
53. जलसडयम् - accumulation of water - पाण्याचा साठा
54. उपदेशम् - advice – सल्ला
55. अवपन् - sowed – पेरली
56. अवरुध्य – obstructing – अडवून
57. मनसि निधाय – having taken into consideration - लक्षात घेऊन
58. अङकुराः उद्‌भूताः - were sprouted/germinated - अंकुर फुटले